International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# महाराष्ट्राचा दीपस्तंभ माननीय श्री वसंतराव नाईक यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान

**डॉ. सौ. वंदना राजेश शिंदे**
इतिहास विभाग, सहाय्यक प्राध्यापक, कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खारेपाटण
*Corresponding Author-* **डॉ. सौ. वंदना राजेश शिंदे**
Email- drvandanashinde8@gmail.com

**प्रस्तावना –**

महाराष्ट्राच्या आर्थिक,सामाजिक व राजकीय जडणघडणीत महाराष्ट्राचे दीपस्तंभ श्री. वसंतराव नाईक यांचे स्थान अत्यंत मोलाचे आहे. महाराष्ट्राच्या राज्यकारभारात सर्वात जास्त मुख्यमंत्रीपद उपभोगणारे सामान्यातील असामान्य असे व्यक्तिमत्व म्हणजे श्री. वसंतराव नाईक होत. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात एका मागास जातीतून आलेले ते एकमेव मुख्यमंत्री होते त्यांनी महाराष्ट्राच्या आर्थिक जडणघडणीसाठी कृषी, औद्योगिक, सामाजिक व सहकारी क्षेत्रातील सुधारणेवर भर दिला. त्यांच्या कारकिर्दीत कृषी, औद्योगिक, सामाजिक व सहकारी क्षेत्राची कामगिरी समाधानकारक असल्यामुळेच आज महाराष्ट्र हा संपूर्ण देशात प्रगत स्थानावर आहे. महाराष्ट्राच्या आधुनिक विकासाचा पाया श्री. वसंतराव नाईक यांच्या काळात घातला गेल्याने ते नवनिर्मित महाराष्ट्राचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जातात. सदरच्या संशोधन पेपरमध्ये त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला आहे..

**संशोधन पद्धती:-** सदरच्या संशोधन पेपरचा हेतू हा हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचा आधारस्तंभ व सर्वात जास्त काळ मुख्यमंत्रीपद गाजविणारे मा. श्री. वसंतराव नाईक यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान अभ्यासणे हा आहे. या कार्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत विषयाच्या लिखाणासाठी काही प्रकाशित व अप्रकाशित प्राथमिक साधने व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे तसेच श्री. वसंतराव नाईक यांचे जीवनचरित्र, त्यांचे विकिपीडिया, गौरवाणी जर्नल, संशोधनपर लेख, वर्तमानपत्रे, दैनिके, मासिके यांच्या आधारे सदरच्या संशोधन पेपरचे लेखन करण्यात आले आहे.

**संशोधनाचा आराखडा:-** सदरच्या संशोधन पेपरमध्ये मा. श्री वसंतराव नाईक यांनी सामाजिक क्षेत्रातील विविध कार्यामध्ये दिलेल्या योगदानाचा आढावा घेण्यात आला आहे. वकिली पेशाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या बंजारा समाजासाठी व तळागाळातील लोकांसाठी केलेल्या कार्याचा आढावाही या संशोधन पेपरमध्ये घेण्यात आला आहे.

**संशोधनाची गरज :-** आत्तापर्यंत मा. मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक यांच्यावर सखोल अभ्यास झालेला नाही. त्यांचे कृषी, सामाजिक,औद्योगिक व सहकार क्षेत्रातील योगदान फारच मोठे आहे. जुन्या मध्यप्रदेशातून बंजारा समाजातील वसंतराव हे पहिलेच कायद्याची पदवी मिळवलेले व्यक्ती ठरतात. त्यांच्या पदवीने त्यांना सामाजिक न्यायाची दृष्टी मिळाली व आपल्या वकिली व्यवसायाला समाजाच्या सेवेसाठी समर्पित केले. वकिलीच्या माध्यमातून त्यांनी समाजातील शोषित, पीडित लोकांच्या अन्यायाला वाचा फोडली एकूणच त्यांनी आपल्या सामाजिक व राजकीय नेतृत्वातून उभ्या महाराष्ट्राला मोहून टाकले होते. सामान्य माणूस ते मुख्यमंत्रीपदापर्यंतचा त्यांचा खडतर प्रवास लक्षात घेतला तर ते सामान्यातील असामान्य कसे होते हे पाहण्यासाठी त्यांचा जीवनपट उलगडणे आवश्यक ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे :-** महाराष्ट्राचा आधारस्तंभ व हरितक्रांतीचे प्रणेते या नात्याने श्री.वसंतराव नाईक यांची भूमिका अभ्यासली आहे.

1. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला आहे.
2. बंजारा समाजासह तळागाळातील लोकांच्या समस्या त्यांनी वकिलीच्या माध्यमातून कशा सोडविल्या याचा मागोवा घेतला आहे.

**संशोधनाची गृहितके:-**

१) बंजारा समाजाची स्थिती खूप दयनीय होती.

२) तळागाळातील लोकांची स्थिती सुधारण्यासाठी श्री. वसंतराव नाईक यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले.

३) वकिलीच्या माध्यमातून त्यांनी समाजाला न्याय मिळवून दिला.

४) श्री. वसंतराव नाईक यांच्या कार्यामुळे केवळ बंजारा समाजातील लोकांनाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांना विविध क्षेत्रात हक्क प्राप्त झाले.

महाराष्ट्राच्या क्षितिजावर अनेक लोककल्याणकारी तारे होऊन गेले ज्यांनी उभ्या महाराष्ट्राच्या आधुनिक विकासाचा इतिहास रचला. महाराष्ट्राच्या सामाजिक,आर्थिक ,सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात या तार्‍याचां सिंहाचा वाटा होता. अशा तार्‍यांमध्ये मा. श्री.वसंतराव नाईक नाईक यांचाही समावेश होतो. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज यांच्या विचार आणि प्रेरणेने भारावून गेलेले श्री .वसंतराव नाईक हे लोककल्याणकारी वृत्तीचे होते. त्यांना जरी राजकीय क्षेत्रात खूप मोठी प्रसिद्धी मिळाली असली तरी त्यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान अत्यंत उल्लेखनीय होते. त्यांचे सुरुवातीचे कार्यक्षेत्र राजकारण हे कधीच नव्हते त्यांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली ती समाजसेवेनेच कारण त्यांचा पिंड हा सत्तेचे राजकारण करण्यापेक्षा राजकारणाचा उपयोग समाजकारणासाठी कसा व कितपत होईल असा होता. त्यामुळे राजकीय कारकिर्दीत देखील त्यांनी समाज कार्याकडे जातीने लक्ष घातले होते. त्यासाठी त्यांनी सामाजिक सुधारणेतून आर्थिक विषमता दूर करण्यावर भर दिलेला होता.

श्री.वसंतराव नाईक यांचा जन्म मागासलेल्या बंजारा समाजात आल्यामुळे आपल्या बंजारा समाजात असणार्‍या अनिष्ट रूढी, परंपरा, जुन्या चालीरीती, अंधश्रद्धा तसेच स्त्री-पुरुषांचा विशिष्ट पेहराव यामध्ये बदल घडवून आणण्यासाठी श्री .वसंतरावांनी स्वतः पुढाकार घेऊन आपल्या समाजकार्याचा प्रारंभ केला आपल्या या कार्यासाठी त्यांनी प्रथम सामाजिक चळवळ उभी केली." मला माझा समाज माझ्या आईपेक्षाही अधिक प्रिय आहे"१ या शब्दाला वसंतराव नाईक आयुष्यभर जागले, त्यांनी आपली सतर्क भूमिका मांडून विरोधकांचा विरोधही मोडून काढला त्यातून त्यांचे आपल्या समाजाविषयी जिव्हाळा, प्रेम दिसून येते. त्यांच्या अंगी उपजत सामाजिक सुधारणा करण्याची व सामान्य लोकांच्या हितासाठी लढण्याची उमेद होती. त्यांचा आपल्या समाजात परंपरेनुसार चालत आलेल्या रूढी, परंपरा ,अंधश्रद्धा यावर विश्वास नव्हता आपल्या समाजाने देखील जुन्या अनिष्ट रूढी बाजूला सारून आधुनिक, नव्या प्रगत समाजाबरोबर पुढे यावे ही त्यांची धारणा होती. आपल्या समाजात सुधारणा झाल्याशिवाय आपल्या समाजाचा विकास होणार नाही हे त्यांनी जाणले होते म्हणूनच त्यांनी अनेक लोककल्याणकारी कार्य हाती घेतले होते.यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्याच्या निसर्गाच्या पायथ्याशी वसलेल्या गहुली या गावात फुलसिंग नाईक व हुनकीबाई यांच्या पोटी १ जुलै १९१३ रोजी श्री. वसंतराव नाईक या महान विभूतीचा जन्म झाला.२ त्यांचे आजोबा चतुरसिंग राठोड हे गहुली गावचे प्रमुख होते. त्यामुळे लोक त्यांना 'नायक' या टोपण नावाने संबोधू लागले पुढे या नायकांचेच रूपांतर नाईक कसे झाले.३

श्री .वसंतरावांना लहानपणी लाडाने हाजूसिंग म्हणत. लहानपणापासून त्यांना मैदानी खेळाबरोबर शिकारीचा पण छंद होता. शिकारीतील अचूकपणा असो वा सामाजिक, राजकीय कार्यातील निर्णय घेण्याची क्षमता असो वसंतराव नाईकांनी त्यांचा

निशाणा कधीच चुकू दिला नाही. लहानपणी त्यांना शिक्षणासाठी खूप पायपीट करावी लागली होती. अत्यंत कठीण परिस्थितीत १९३८ मध्ये नागपूरच्या मॅरीस महाविद्यालयातून ते बी.ए. झाले तर १९४० मध्ये त्यांनी कायद्याची पदवी प्राप्त केली. जुन्या मध्यप्रदेशातून बंजारा समाजातील वसंतराव हे पहिलेच कायद्याची पदवी घेणारे व्यक्ती ठरले. कायद्याच्या पदवीनंतर त्यांनी स्वतःला समाजकार्यात वाहून घेतले कारण वकिलीमुळेच त्यांना सामाजिक न्यायाची दृष्टी मिळाली होती. त्यांची सामाजिक कार्यसंपदा प्रचंड मोठी होती. तिचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**ग्रामीण भागातील सुधारणा:-** श्री वसंतराव नाईकांचा जनसंपर्क मोठा असल्याने त्यांची पुसदच्या तालुकाध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यावेळी त्यांनी तालुक्यातील अनेक गावे रस्त्यांना जोडत तालुक्याच्या विकासाला चालना दिली. लहानपणापासून त्यांनी ग्रामीण जीवन जवळून पाहिले होते. खेड्यातील लोकांच्या समस्याची त्यांना चांगलीच जाणीव होती म्हणून खेडयांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांनी "ग्राम विकास सुधारणा " हा कार्यक्रम हाती घेऊन अनेक आदर्श योजना राबवून थोड्याच काळात गहूली हे गाव आदर्श करून दाखवले.४ गहुली गावासह आसपासच्या १२ गावात विकासाची योजना राबवली. सर्व गावातील रस्ते रेखीव व प्रमाणबद्ध करून पूर्वीच्या वेड्यावाकड्या वसाहती प्रमाणबद्ध केल्या तसेच सर्व गावात साक्षरतेची मोहीम राबवून ज्याठिकाणी शाळा नाहीत त्या ठिकाणी शाळा सुरू केल्या.

**बंजारा समाजातील स्त्रियांच्या पेहरावामध्ये बदल:-** पूर्वीपासून बंजारा समाज हा रानावनात व जंगलात तांडा करून राहणारा समाज होता. या समाजातील स्त्रिया परंपरेनुसार चालत आलेला लेहंगा वापरीत त्यामध्ये फेटिया, काचळी,ॲटी चोटला जो वजनदार असल्यामुळे स्त्रियांना तो दररोज बदलणे शक्य नव्हते. पण आरोग्याच्या दृष्टीने ते घातक असल्याने वसंतरावांना आपल्या स्त्रियांची वेशभूषा व केशभूषा असंस्कृत व गैरसोयीचे वाटली म्हणून त्यांनी प्रथम या पेहरावाविरुद्ध आवाज उठविला.५ आपल्या समाजातील स्त्रियांनी महाराष्ट्रीयन पद्धतीचा नऊवारी साडी चोळीचा पेहराव करावा हा आग्रह धरला व या बदलाची सुरुवात त्यांनी स्वतःच्या घरापासून केली.

**दारूबंदी केली:-** कोणत्याही समाजाला लागलेले व्यसन मग ते कोणतेही असो वाईटच असते.बंजारी समाजाला ज्या घातक प्रवृत्तीने ग्रासलेले होते ते म्हणजे मद्यपान होय समाजातील दारिद्र्याचे मूळ कारण दारू हे होते. दारुच्या व्यसनाधीनतेमुळे बंजारी समाज आर्थिक व सामाजिकदृष्ट्या पोखरत चालला होता हे ओळखून वसंतरावांनी दारूबंदीच्या कार्याला सुरुवात केली.६ तसेच अनेकांचे उधवस्त झालेले संसार पुन्हा उभे केले.

**स्त्री शिक्षणावर भर:-** एखाद्या घरातील एखादी स्त्री शिकली तर तिचे संपूर्ण कुटुंब शिक्षित होते याची जाणीव वसंतरावांना होती म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणावर जास्त भर दिला. संपूर्ण समाजातील स्त्रियांना एकत्र बोलावून त्यांना शिक्षणाविषयी उपदेश तसेच त्यांनी १९३७ मध्ये पुसद तालुक्यातील गहुली गावात बंजारा समाजातील महिलांच्या परिषदेचे आयोजन करून जमलेल्या असंख्य स्त्रियांमध्ये आपल्या भाषेतून स्त्री शिक्षणाची जनजागृती केली.**7**

**अस्पृश्यता निवारणाचे कार्य:-** श्री. वसंतराव नाईकांनी आपल्या मनमिळावू स्वभावामुळे अनेक जातीशी जिव्हाळयाचे संबंध ठेवले होते ते कधीच भेदभाव मानीत नसत. अस्पृश्यता, शिवाशिव या गोष्टींची त्यांना मनापासुन चीड होती याविषयी ते स्वतः म्हणत," माणूस हा सर्वप्रथम माणूस राहिला पाहिजे त्याला जातीच्या नावाखाली कमी लेखणे यासारखा दुसरा असंस्कृतपणा कोणताही नाही.८

**भूदान चळवळीतील योगदान:-** विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या भूदान चळवळीचा श्री. वसंतराव नाईक यांच्यावर मोठा प्रभाव पडला होता. त्यांच्या मते,"भूदान म्हणजे शांततामय मार्गाने होणारी क्रांती होय".९ जमिनीच्या धारणक्षेत्रात भूदानातून समानता आणण्यासाठी वसंतरावांनी अविरत प्रयत्न केले. विनोबा भावे यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन समाजातील भूमिहीन वर्गासाठी कार्य केले व स्वतःच्या हिस्सातील जमिनीचा सहावा हिस्सा जमीन भूदानासाठी देऊन टाकली.

**परोपकाराची जाण असलेला धुरंदर राजकारणी नेता:-** वसंतरावांना विद्यार्थीदशेपासूनच समाजकार्याची आवड होती. त्यांचा जनसंपर्क प्रचंड मोठा होता. जनसंपर्कामुळेच ते जनतेच्या जवळ पोहोचले होते. ज्यावेळी ते मुख्यमंत्री होते त्यावेळी महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेसाठी त्यांचा दरबार कधीही खुला असायचा. ते सतत कामात मग्न असत त्यांनी गोरगरीबांची दुःखे ही आपली दुखे मानली होती. गोरगरिबांना दान देताना कधीही त्यांनी परकेपणा दाखवला नाही. ते नेहमी म्हणत,"माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत जनतेची सेवा करणे हाच मी माझा धर्म मानलेला आहे". अत्यंत उमदे , कर्तुत्ववान व्यक्तिमत्त्व म्हणून ते नावारूपाला आले होते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना वसंतरावांच्या अंगी असलेल्या स्वतंत्र विचारसारणी, मुसद्दी शिकारी, धुरंधर राजकारणी, कणखर भूमिका घेण्याची वृत्ती, कर्तबगारी व तडफदारपणा या गुणांची जाणीव होती म्हणून त्यांनी उभ्या महाराष्ट्राची सूत्रे वसंतरावांच्या हाती सोपवली. वसंतरावांनी ती कामगिरी चोखपणे पूर्ण केली. याविषयी स्वतः वसंतराव म्हणतात," मला घडविण्यामध्ये माझ्या आई-वडिलांचा, माझ्या भावांचा व जनतेचा जेवढा वाटा आहे तेवढाच वाटा यशवंतरावजी आपलाही आहे.१०

**कुटुंबनियोजनाच्या कार्यावर भर:-** जगात लोकसंख्येच्याबाबतीत भारताचा दुसरा क्रमांक लागतो.१९२०-२१ नंतर भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढली होती. ज्यावेळी १९६३ मध्ये श्री. वसंतराव मुख्यमंत्री झाले त्याच वेळी महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला व अन्नधान्याचे उत्पादन घटले. भरमसाठ लोकसंख्येमुळे अन्नधान्याची टंचाई भासू लागली. त्यावेळी वसंतरावांनी जनतेसमोर कुटुंबनियोजनविषयी आपले विचार मांडले."संरक्षण आघाडी व अन्न आघाडी सांभाळण्यासाठी आपण जशी प्रयत्नांची पराकाष्टा करीत आहोत त्याचप्रमाणे कुटुंब नियोजनाच्या आघाडीकडे ही तितकेच लक्ष देणे गरजेचे आहे.म्हणून प्रत्येक नागरिकाने राष्ट्रीय कार्य म्हणून कुटुंबनियोजनाचा अवलंब केला पाहिजे.११

एकूणच स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राचा आधारस्तंभ या नात्याने मा. मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सुजलाम-सुफलाम केले. त्यांनी कृषी, औद्योगिक, सामाजिक व सहकारी क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. त्यांच्या शेतीविषयक कार्याचे कौतुक तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनीही केले व संपूर्ण देशात रोजगार हमी योजना राबविली. अशा या लोककल्याणकारी, धुरंधर तसेच शेतकऱ्यांसाठी व तळागाळातील जनतेसाठी अविरत झटणाऱ्या या झुंजार नेत्याचे १९७९ साली वयाच्या ६६ व्या वर्षी अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात परभणी येथील कृषी विद्यापीठाला वसंतराव नाईक विद्यापीठ हे नाव देण्यात आले. त्यांच्या जन्मगावी गहुली व पुसद मध्येही ही त्यांचे स्मारक उभारण्यात आले. नागपूरच्या मॅरीस येथील महाविद्यालयात यांच्या नावाने एक सभागृह बांधण्यात आले. त्यांच्या कृषीविषयक कार्याची दखल घेऊन दरवर्षी १ जुलै हा त्यांच्या जयंतीदिन महाराष्ट्रामध्ये कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. धुरंदर ,लोककल्याणकारी महाराष्ट्राच्या नेत्याला कोटी कोटी प्रणाम!

निष्कर्ष:-

श्री. वसंतराव नाईक हे कुशल प्रशासक, लोककल्याणकारी व धुरंधर राजकारणी नेते होते. त्यांनी रानावनात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजातील अनिष्ट रूढी व परंपरेचे समूळ उच्चाटन करून आपल्या समाजात परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या या महान सामाजिक कार्यामुळे आज बंजारा समाज सुशिक्षित बनला व विकासाच्या दृष्टीने वाटचाल करीत आहे. आपल्या समाजाला मद्यपानाची जबरदस्त कीड लागली होती ती त्यांनी समूळ नष्ट केली. ही गोष्ट त्यांनी कायद्याने नाही तर आपल्या विश्वासाने, कर्तबगारीने व प्रेरणादायी व्याख्यानाने नष्ट केली. ज्यावेळी श्री. वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री बनले त्यावेळी अनेक लोक आपल्या समस्या घेऊन रात्री बेरात्री त्यांच्या घरी येत असत तेव्हा वसंतरावांनी त्यांचा कधीच त्रागा केला नाही. उलट गोरगरिबांची दुःखे ही ते आपली मानत असत. त्यांनी सामाजिक

कार्याची सुरुवात करताना कोणत्याही गोष्टीच्या बदलाची सुरुवात स्वतःपासून व स्वतःच्या घरापासून केली. महाराष्ट्रातील खेडी सुधारल्याशिवाय महाराष्ट्रात सुधारणा होणार नाही याची जाणीव ठेवून त्यांनी अनेक ठिकाणी ग्राम सुधारणा योजना यशस्वीरित्या राबवल्या. देशातील प्रत्येक माणूस हा आपुलकीच्या व परस्पर स्नेहाच्या धाग्याने बांधला गेला पाहिजे असे त्यांचे मत होते. राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यासाठी ते नेहमी म्हणत,"काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत सारा देश माझा व मी देशाचा आहे ही आपली भावना नव्हे तर निष्ठा बनली पाहिजे यासाठी आपण सर्वांनी एकजूट केली पाहिजे त्यातूनच राष्ट्रीय ऐक्याची शक्ती वाढत जाईल"असे धुरंधर, तेजस्वी, लोककल्याणकारी व्यक्तिमत्व महाराष्ट्राला लाभलेले होते म्हणून त्यांना दिलेली महाराष्ट्राचा आधारस्तंभ ही उपमा अगदी योग्यच आहे असे वाटते.

**संदर्भ साधने**

१) रमेश जाधव:- वसंतयुग, गोरवाणी प्रकाशन, प्रथमावृत्ती, औरंगाबाद, २०१३, पृ. कर.४

२) उत्तम रुद्रवार:-महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक, कृषी औद्योगिक क्रांतीचे प्रणेते,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, जुलै २००४, पृ.क्र.३

३) उपरोक्त, उत्तम रुद्रवार पृ.क्र.२

४) बैस रामबिहारी सिंग:- वसंतराव नाईक जीवनचरित्र, अभिजात प्रकाशन, खामला,
नागपूर १९८७.

५) रमेश जाधव:-गोरवाणी International Refered juneral, गोरवाणी प्रकाशन, औरंगाबाद,
२०१३, पृ. क्र.

६) उपरोक्त, रमेश जाधव पृ.क्र.४

७) राजाराम राठोड:- हिरवी क्षितिजे, शिवपार्वती कल्पना मुद्रणालय, पुणे, १९७३, पृ. क्र.६२

८) तत्रैव, पृ.क्र.६२

९) जयप्रकाश मिश्रा:- कृषी अर्थशास्त्र, साहित्यभवन पब्लिकेशन ,आग्रा, पृ. क्र.१८५

१०) डॉ.अशोक पवार:- वसंतराव नाईक यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान, Indian Journal of Research, Page No 39

११) तत्रैव ,पृ.क.३९